महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/हु.दिन/२०२३/ 482 दिनांक : 27 JAN 2023

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/
खाजगी विनाअनुदानित संस्था.

**विषय : - दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजी सकाळी ११ वाजता दोन मिनीटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस "हुतात्मा दिन"म्हणून पाळण्याबाबत..**

संदर्भ : - म.शा.सा.प्र.वि.मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक : जपुती २२२३ – प्र.क्र.२३/कार्या.२९ दिनांक : २७ जानेवारी, २०२३.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने या विभागाच्या अधिनस्त सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थांच्या संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, दिनांक ३० जानेवारी,२०२३ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता दोन मिनीटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. सोमवार दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पाळण्यात यावयाच्या मौन (स्तब्धता) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यंत इशारा भोंगा वाजविण्यात यावा. सदर इशारा संपल्यानंतर सर्व संस्था प्रमूखांनी आपल्या संस्थेत सर्वांनी दोन मिनीटे मौन (स्तब्धता) पाळावे, सकाळी ठिक ११.०२ वाजता मिनीटांनी मौन (स्तब्धता) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा सकाळी ११.०३ मिनीटापर्यंत वाजविण्यात येईल.

जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे वरीलप्रमाणे सकाळी ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभीरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून देण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व संस्थाप्रमुखांनी संदर्भीय शासन परिपत्रकाचे अवलोकन करुन, सदर परिपत्रकामध्ये नमूद मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

सोबत : संदर्भिय शासन परिपत्रक.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

**दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन ( स्तब्धता) पाळून हा दिवस " हुतात्मा दिन" म्हणून पाळण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : जपुती २२२३/प्र.क्र.२३/कार्या.२९**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ जानेवारी, २०२३.

**वाचा** :- केंद्रीय गृह मंत्रालयाचे क्र.२/१/२०२३-public, दिनांक १२ जानेवारी,२०२३ चे पत्र.

**परिपत्रक**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही सोमवार, दिनांक ३० जानेवारी,२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता ) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. सोमवार, दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पाळण्यात यावयाच्या मौन (स्तब्धता) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यन्त इशारा भोंगा वाजविण्यात येईल. सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालये/ आस्थापना/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठे या मधील अधिकारी/कर्मचारी/ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी /विद्यार्थी तसेच नागरिक आदी सर्वांनी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळावे, सकाळी ठिक ११.०२ मिनिटांनी मौन ( स्तब्धता ) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा सकाळी ठिक ११.०३ मिनिटांपर्यन्त वाजविण्यात येईल.

२. जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे वरीलप्रमाणे सकाळी ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभीरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता ) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३०१२७१५३४५३९५०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SANGITA VIJAYRAO GULHANE

Digitally signed by SANGITA VIJAYRAO GULHANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=a549c907684bdc261632b9e0551a3c8b98d359136f4a16 0eaf3e04020425a2a4, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8BE1DF110A92BF2360541A75E738EEF3464E230A 27D8FE0AD85CE372CBE6BF6B, cn=SANGITA VIJAYRAO GULHANE
Date: 2023.01.27 15:39:29 +05'30'

**( सं. वि. गुल्हाणे )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई,
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
६. अ.मु.स. (प्र.सु.,र.व का.),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.
७. सर्व मा. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,